N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** भुसावळ शहर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0205 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/11/2021 20:45 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 15/11/2021

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/11/2021

**Time From (वेळेपासून):** 13:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:05 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/11/2021 **Time (वेळ):** 18:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 017 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/11/2021 18:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.05 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** भुसावळ शहरातील,दुय्यम ,कारागह ,भुसावळ येथे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** रजनी रविंद्र खरात

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

13.Action
(केलेली कारवाई:
(1) Registere

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रेल्वे हस्पीटल मागे समता नगर ,भुसावळ ,भुसावळ शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रेल्वे हस्पीटल मागे समता नगर ,भुसावळ ,भुसावळ शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल लोटन देवरे | | | 1. प्लाट नं 37 जितेंद्र नगर,नकाने रोड, धुळे,भुसावळ शहर,जळगाव,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2,000/ रु.त्यात 500/ रुपये दराच्या 04 नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्कवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

भुसावळ शहर पो.स्टे गु.र.नं. 205/2021 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम चे कलम प्रमाणे. फिर्यादी - रजनी रविंद्र खरात ,वय-48वर्ष, धंदा - घरकाम, रा.रेल्वे हास्पीटल मागे ,समता नगर,भुसावळ,ता.भुसावळ आरोपीचे नाव व पत्ता - अनिल लोटन देवरे,वय-41 वर्ष, व्यवसाय नोकरी पोलीस कान्स्टेबल मुळ नेमणुक - जिल्हा कारागृह जळगांव ,ता.जि.जळगांव प्रतिनियुक्ती नेमणुक -दुयम कारागृह , भुसावळ ,ता.भुसावळ जि.जळगांव,रा.प्लाट नं. जितेंद्र नगर,नकाने रोड,धुळे,जि.धुळे ,खाते जिल्हा कारागृह पोलीस ,वर्ग गुन्हा घडला ता.वेळ व ठिकाण दिनांक -15/11/2021 रोजी 13.05वा.भुसावळ शहरातील भुसावळ दुयम कारागृह ,भुसावळ येथे .गुन्हा दाखल ता.व वेळ दिनांक 15/11/2021 रोजी 18.59 वा. लाचेची मागणी रक्कम 3,000/- रु. हस्तगत लाचेची रक्कम 2,000 /- रु.त्यात 500/- रुपये दराच्या 04 नोटा सापळा व तपास अधिकारी - एस.के.बच्छाव ,पोलीस निरीक्षक ,अन्टी करप्शन ब्युरो,जळगांव गुन्हयाची थोडक्यात हकिगत यातील फिर्यादी यांचा मुलगा नामे हंसराज रविंद्र खरात याचे विरुध्द भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे हत्यार बाळगल्याचा गुन्हा दाखल आहे. त्यास दि.02/11/2021रोजी मा.कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याची न्यायालयीन कोठडी मंजुर करुन भुसावळ येथील दुयम कारागृह येथे पाठविले होते. सदर दिवशी फिर्यादी हे त्यांचे मुलास भेटण्यासाठी दुयम कारागृह ,भुसावळ येथे गेले असता त्यांचे मुलास जिल्हा कारागृह जळगांव येथे पाठविणार असल्याचे समजले.तेव्हां फिर्यादी यांनी जेल पोलीस देवरे यांची भेट घेतली असता त्यांनी फिर्यादीस तुमच्या मुलास जिल कारागृहात पाठवुन देवु .असे जेलर साहेबांनी सांगितले आहे.तुमच्या मुलाला भुसावळ येथेच ठेवायचे असेल आणि त्याला खाण्याच्या वस्तु देण्यासाठी व भेटु देण्यासाठी तसेच इतर सवलती पाहिजे असतील तर तुम्ही 3,000/- रु.आणुन दया .असे सांगितले फिर्यादी यांनी दि.10/11/2021 रोजी अन्टी करप्शन ब्युरो जळगांव येथे तक्रार दिली होती. सदर तक्रारीची अन्टी करप्शन ब्युरो जळगांव पथकाने दि.10/11/2021रोजी पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी जेलर साहेबांचे नाव सांगुन स्वता साठी पंचासमक्ष 3,000/- रु.लाचेची मागणी केली त्यानंतर नमुद आरोपी यांनी सदर लाच रक्कमेपैकी 2,000/- रु.लाच रक्कम फिर्यादी यांचे कडुन दि.15/11/2021 वर नमुद वेळी व ठिकाणी स्वता स्विकारली म्हणुन गुन्हा . सोबत टंकलिखीत फिर्याद जोडली आहेत.

13. Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): babasaheb bajirao thombre(I (Inspector)) / PCMH94087 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

रजनी खराटे

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
अमळनेर शहर पो.स्टे.

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): babasaheb bajirao thombre
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH94087

फिर्याद

भुसावळ शहर पोलीस स्टेशन
दिनांक १५.११.२०२१

**मी रजनी रविंद्र खरात, वय ४८ वर्षे, व्यवसाय घरकाम रा.रेल्वे हॉस्पिटलमागे, समता नगर, भुसावळ ता.भुसावळ जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहून देते की, मी वरील ठिकाणी माझे कुटूंबासह राहते. मी मोलमजुरी करुन माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करते. मला चार मुले असुन त्यापैकी तीन मुले शिक्षणासाठी बाहेर गावी आहेत. माझा लहान मुलगा हंसराज हा भुसावळ येथे माझे जवळच राहतो. मुलगा हंसराज याचेवर भुसावळ शहरातील विविध पोलीस स्टेशन मध्ये गंभीर गुन्हे दाखल आहेत.त्यामुळे मागील सहा महिन्यापुर्वी भुसावळ येथील उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी हंसराज यास भुसावळ शहरातुन दोन वर्षाकरीता तडीपार करण्याची नोटीस दिली होती. सदर नोटीस आम्ही उपविभागीय अधिकारी भुसावळ, भाग यांचे कडून रद्द केली होती. त्यानंतर पुन्हा पोलीस अधिक्षक, जळगांव यांनी दि.१३.०८.२०२१ रोजी मुलगा हंसराज यास भुसावळ शहरातुन दोन वर्षासाठी तडीपार करण्याची नोटीस दिली होती. त्यानुसार तो भुसावळ सोडुन औरंगाबाद येथे राहण्यास गेला होता.

मुलगा हंसराज खरात हा दिवाळी सणाच्या निमीत्ताने दि.०१.११.२०२१ रोजी रात्री १२.१५ ते १२.३० वा चे सुमारास भुसावळ येथे घरी आला होता परंतु आम्ही नातेवाईकांचे लग्नासाठी अमरावती येथे गेलो असल्याने आमच्या घरास कुलुप होते. त्यामुळे हंसराज हा जेवण करण्यासाठी रात्री ०१.०० ते ०१.३० वा चे सुमारास रेल्वे रेस्ट हाऊस भुसावळ येथे गेला होता. तेव्हा त्यास पोलीसांनी पकडुन बाजारपेठ पोलीस स्टेशन भुसावळ येथे घेवुन गेले. तेथे पोलीसांनी त्यांची झडती घेतली असता त्याच्या ताब्यात पिस्तुल मिळुन आल्याने त्याच्यावर बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे हत्यार बाळगल्याचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर त्यास भुसावळ न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची दि.०२.११.२०२१ रोजी न्यायालयीन कोठडी मंजुर केली. त्यानंतर हंसराज यास भुसावळ दुय्यम कारागृह भुसावळ येथे पाठविले होते.

त्यानंतर मी लागलीच त्याच दिवशी दुय्यम कारागृह भुसावळ येथे माझा मुलगा हंसराज यास भेटण्यासाठी गेले असता मला समजले की, माझा मुलगा हंसराज यास जिल्हा कारागृह जळगांव येथे पाठविणार आहेत. त्यामुळे मी तेथे डयुटीस असलेले जेल पोलीस देवरे यांना कारागृहाचे बाहेर भेटून विचारपुस केली तेव्हा जेल पोलीस देवरे यांनी मला सांगितले की, भुसावळ कारागृहात तीनच खोल्या असल्याने व आरोपी ठेवण्यास जागा नसल्याने जिल्हा कारागृहात पाठवुन देवु असे जेलर साहेबांनी सांगितले आहे. तुमचा मुलगा हंसराज यास जर भुसावळ कारागृहातच ठेवायचे असेल आणि त्यास खाण्याच्या वस्तु देण्यासाठी व भेटु देण्यासाठी व इतर सवलती पाहीजे असतील तर तुम्ही जेलर साहेब व माझेसाठी ३,०००/—रुपये आणुन द्या. तुम्ही जर ३,०००/—रुपये आणुन दिले नाही तर तुमच्या मुलाला सब जेल जळगांव येथे पाठवुन देवु, त्याला घरचा खाण्याच्या वस्तु देवु देणार नाहीत व तुम्हाला भेटुही देणार नाहीत असे सांगितले, तेव्हा जेल पोलीस देवरे यांना मी साहेबांना भेटुन विनंती करते असे सांगितले असता त्यांनी साहेब कोणाला भेटत नाही, तुम्ही माझेजवळ पैसे आणुन द्या, तुमचे काम बरोबर होवुन जाईल, असे सांगितले. त्यावरुन माझे लक्षात आले की जेल पोलीस देवरे हे जेलर साहेबांचे नाव सांगुन माझेकडे ३,०००/—रुपये लाचेची मागणी करीत आहे. परंतु दिवाळीचा सण असल्याने व माझे कडे पैसे देखील नसल्याने मी जेल पोलीस देवरे यांना तुम्हाला नंतर येवुन भेटते असे सांगुन तेथुन निघुन आली होती.त्याबाबत मी दि.१०.११.२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात तक्रार दिली होती.

त्यावेळी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाचे पोलीस निरीक्षक एस.के.बच्छाव साहेब यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले होते. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी दोन्ही पंचाचा सापळा पथकाचा व माझा आपआपसात परीचय करून दिला. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी एक खाजगी वाहन उपलब्ध करुन सदर वाहनात बच्छाव साहेब, दोन पंच, मी, महीला पोलीस कर्मचारी व सापळा पथक असे कार्यालयातुन रवाना होवुन भुसावळ शहरातील भुसावळ न्यायालयाच्या मागील बाजुस गेलो. सदर ठिकाणी बच्छाव साहेब यांनी माझे व दोन्ही पंचाचे त्यांचे जवळील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना सुचना दिल्यात. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे जवळील पर्स मधील एका कप्प्यात ठेवुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह जवळच असलेल्या दुय्यम कारागृह भुसावळ येथे जेल पोलीस देवरे यांची भेट घेण्यासाठी पायी रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्र .१ असे पायी चालत दुय्यम कारागृह भुसावळ येथे गेलो. सदर ठिकाणी जेल पोलीस देवरे हे दिसुन न आल्याने तेथे उपस्थीत असलेल्या एका डयुटीवरील खाकी गणवेशातील इसमास देवरे यांचे बाबत विचारपुस केली. तेव्हा त्यांनी ते १५ ते २० मिनिटात येतील असे सांगितले. त्यामुळे मी व पंच क्र. १ असे सदर ठिकाणी थांबुन होते. त्यानंतर काही वेळाने जेल पोलीस देवरे हे सदर ठिकाणी आले. तेव्हा माझी जेल पोलीस देवरे यांच्याशी भेट झाली. तेव्हा जेल पोलीस देवरे व माझेत माझा मुलगा हंसराज यास जळगांव येथे न पाठविणे बाबतच्या कामाचे संदर्भात चर्चा झाली. तेव्हा जेल पोलीस देवरे यांनी मला त्यांचे उजवे हाताचे तीन बोटे दाखवुन देवुन द्या ना, आता आणले आहेत का? असे विचारले तेव्हा मी त्यांना पैसे आणलेले नाहीत, पुर्ण तीन हजार द्यावे लागतील का? असे विचारले असता जेल पोलीस देवरे यांनी होकार दर्शविला. त्यानंतर मी त्यांना पैसे आताच द्यावे लागतील का? असे विचारले असता जेल पोलीस देवरे यांनी दोन तीन दिवस उशिरा द्या, नंतर द्या वाटल्यास, असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझेत व जेल पोलीस देवरे यांचेत

रजनी खरात

संभाषण दोन्ही पंचानी, बच्छाव साहेब व सापळा पथकाने ऐकले. सदरचे संभाषण ऐकुन बच्छाव साहेब, दोन्ही पंचाची व सापळा पथकाची लाच मागणी बाबत खात्री झाली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला ३,०००/–रु. घेवुन दि.१५.११.२०२१ रोजी याच ठिकाणी हजर रहावे बाबत सुचना दिल्या होत्या. तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर दि.१५.११.२०२१ रोजी मी भुसावळ शहरातील भुसावळ न्यायालयाच्या मागील बाजुस हजर होते. त्यानंतर एका खाजगी वाहनाने बच्छाव साहेब, दोन पंच, महीला पोलीस कर्मचारी व सापळा पथक असे सदर ठिकाणी आले.तेव्हा मीं जेल पोलीस देवरे यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली ३०००/– रू. रक्कम (त्यात ५००/–रू.दराच्या ०६ नोटा) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केले. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ. पावडर लावुन सदरच्या नोटा माझे जवळील पर्स मधील पाहिल्या कप्प्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या. तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे जवळील पर्समधील दुस–या कप्प्यात ठेवुन दिले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला पंच क्र. १ यांचेसह जेल पोलीस देवरे यांची भेट घेण्यासाठी दुय्यम कारागृह भुसावळ येथे पायी पाठविले होते. तेव्हा बच्छाव साहेब यांनी भुसावळ दुयम कारागृहाच्या आजुबाजुस सापळा लावला होता. तेव्हा मी व पंच क्रं. १ अशांनी जेल पोलीस देवरे यांची भेट घेतली. तेव्हा माझेत व जेल पोलीस देवरे यांचेत माझे कामाविषयी चर्चा झाली. त्यानंतर मी माझे जवळील पर्समधील पहिल्या कप्प्यात असलेले ३०००/–रुपये (त्यात ५००/– रुपये दराच्या ०६ नोटा) लाच रक्कम माझे उजव्या हाताने पर्स मधुन बाहेर काढुन सदरची रक्कम जेल पोलीस देवरे यांचे समोर धरली असता त्यांनी दोन हजार रुपयेच द्या असे सांगितले. तेव्हा मी माझे उजव्या हातात असलेल्या ३०००/–रुपयांपैकी १०००/–रुपये (त्यात ५००/– रुपये दराच्या ०२ नोटा) बाजुस काढून सदरच्या नोटा पर्स मध्ये पहिल्या कप्प्यात पुन्हा परत ठेवुन दिल्या. व उर्वरीत २०००/–रुपये (त्यात ५००/– रुपये दराच्या ०४ नोटा) उजव्या हाताने जेल पोलीस देवरे यांचे समोर धरले असता सदर लाच रक्कम २०००/–रु. जेल पोलीस देवरे यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या बरमुडा पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन घेतल्या. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास इशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी जेल पोलीस देवरे यांना रंगेहाथ पकडले. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे जवळील पर्समधील दुस–या कप्प्यात ठेवलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी जेल पोलीस देवरे यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी जेल पोलीस देवरे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव अनिल लोटन देवरे, वय ४१, व्यवसाय नोकरी कारागृह रक्षक मुळ नेमणुक जिल्हा कारागृह जळगांव, ता.जि.जळगांव प्रतिनियुक्ती नेमणुक दुय्यम कारागृह, भुसावळ ता.भुसावळ जि.जळगांव रा.प्लॉट नं.३७, जितेंद्रनगर, नकाने रोड,धुळे जि.धुळे असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालय येथे जावुन करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये आरोपी अनिल देवरे, माझे जवळील पर्सची,माझे दोन्ही हातांची व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई केली आहे. तसा पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी अनिल लोटन देवरे, कारागृह रक्षक मुळ नेमणुक जिल्हा कारागृह जळगांव, ता.जि.जळगांव प्रतिनियुक्ती नेमणुक दुय्यम कारागृह, भुसावळ ता.भुसावळ जि.जळगांव यांनी दि.१०.११.२०२१ रोजी पंचासमक्ष माझे मुलास जळगांव जिल्हा कारागृहात न पाठविण्यासाठी तसेच त्याला खाण्याच्या वस्तु देण्यासाठी व भेटू देण्यासाठी तसेच इतर सवलती देण्याच्या मोबदल्यात ३०००/–रु. लाच मागणी केली व सदर लाच रक्कमे पैकी २०००/–रु. लाच रक्कम आरोपी यांनी माझे कडून दि.१५.११.२०२१ रोजी १३.०५ वा. भुसावळ शहरातील दुय्यम कारागृहाचे आवारात स्वत: स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी अनिल लोटन देवरे यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद संगणकावर मराठी भाषेत टंकलीखीत केलेली फिर्याद मला वाचुन दाखविली ती मला समजली सदरची फिर्याद माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

एस.के.बच्छाव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

फिर्यादीची सही

रजनी रवराट